# <u>विशेष दिवाणी दावा क्रमांक ९२/२०१२ मधील</u>
# <u>निशाणी २१० वरील आदेश</u>

(दिनांक १८/०९/२०१९)

१. अर्ज व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी तर्फे विद्वांन वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील दस्तऐवज पाहिले.

२. वादीनी प्रस्तुतचे वादपत्र खरेदीपत्र होऊन मिळणेसाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेले आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादी नं. २६/२ ने कायदेशीर मुदतीत म्हणणे सादर न केल्याने त्यांच्या विरुद्ध म्हणणे नाही असा आदेश झालेला आहे. प्रस्तुत कामी प्रतिवादीला ता. १७/०७/२०१९ रोजी नोटीस मिळाली. प्रतिवादी या आजारी असल्याने व डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार त्याना या कामी हजर राहता आले नाही व मुदतीत कैफियत देता आली नाही. त्यामुळे वादपत्रास म्हणणे दाखल करुन घेण्यासाठी प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यावर वादीने म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत घेतलेली आहे व अर्ज मोघम स्वरुपाचा असल्याने तो अमान्य करण्याची विनंती केली आहे.

३. प्रकरण पाहिले. दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादपत्राचे स्वरुप पहाता प्रतिवादीचे वादपत्रास म्हणणे अभिलेखावर दाखल करुन न घेतल्यास त्यांचे अपरिमित नुकसान होणार आहे. याउलट प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास व प्रतिवादीची कैफियत अभिलेखावर घेतल्यास प्रकरण गुणावगुणावरती चालुन निकाली होण्यास मदत होणार आहे. सबब, पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# आ दे श

१. प्रतिवादी क्र. २६/२ यांची कैफियत/म्हणणे अभिलेखावर घेण्यात येत आहे.

२. दाव्याचा निकाल काहीही झाला तरी या अर्जाचा खर्च प्रतिवादी क्रमांक २६/२ यांनी सहन करावयाचा आहे.

sd/-

सांगली. (वि. रा. पाटील)
दिनांकः- १८/०९/२०१९ ३रे सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, सांगली.